(Synopsis)

"सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास:- नाशिक जिल्हा "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला सारांश

संशोधक

अनिल लक्ष्मण गायकवाड

उपप्राचार्य / विभागप्रमुख

क ग दा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड

मार्गदर्शक

डॉ. तुकाराम मुंडे

उपप्राचार्य व प्राध्यापक

के के एम महाविद्यालय

मानवत ता. मानवत, जि. परभणी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

एप्रिल - २०१९

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

१. प्रस्तावना

साखर उद्योगाने आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग हा कृषी औद्योगिक शेत्रातील एक प्रमुख संघटीत उद्योग आहे. सहकारामुळे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मूलगामी परिणाम घडवून आणणारा उद्योग म्हणून साखर उद्योग ओळखला जातो. राज्यातील साखर कारखानदारील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक दृष्ट्या महत्व प्राप्त झालेले आहे. भारतात आणि विशेषत: महाराष्ट्रातील ग्रामीण भागांचा विकास हे साखर उद्योगाचे फलित आहे. जगात साखर उत्पादनात भारताचा पहिला क्रमांक लागत असून, जागतिक साखर उत्पादनामध्ये भारताचा वाटा १५.४४ टक्के आहे. देशात २०००-२००१ मध्ये ४३६ साखर कारखाने उर्जित अवस्थेत होते. तर महाराष्ट्रात २००१-२००२ मध्ये १३५ व २००२-२००३. मध्ये १४१ साखर कारखाने उर्जित अवस्थेत होते. साखर कारखान्यांची संख्या वरचेवर वाढत असल्याने ग्रामीण भागातील कुशल व अकुशल कामगारांना साखर कारखान्यात हंगामी व कायमस्वरूपीचे काम उपलब्ध होत आहे.

साखर कारखान्यांनी ग्रामीण भागात उद्योगांचे विकेंद्रीकरण करण्यास मदत केली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचा विकासदेखील प्रभावीपणे झालेला आहे. या साखर कारखान्यामुळे, अगदी लहान शेतकरी अप्रत्यक्षपणे साखर कारखान्यांच्या त्यांच्या सभासदत्वामुळे उद्योजक बनले आहेत, जे अनेक उप-उत्पादने देतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळा, सार्वजनिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये इत्यादी स्थापन करण्यास साखर कारखाने हे मैलाचे दगड (Milestone) ठरत आहेत. त्यांनी दवाखाना, दूध दुग्धशाळा, पोल्ट्री फार्म, ग्राहक, दुकाने, बँका, वाचनालये, मनोरंजन केंद्र, कार्यशाळा, तेल गिरणी आणि ग्रामीण भागातील बाजार तसेच, ऊस उत्पादकतेसाठी, हे कारखाने विविध लिफ्ट सिंचन योजना, लहान मध्यम आणि मोठे पाण्याची टाकी अंमलात आणत आहेत आणि मोठ्या प्रमाणात जमिनींवर सिंचन सुविधा पुरविल्या आहेत. त्याचप्रमाणे, त्यांनी त्यांच्या कार्य क्षेत्रातील रस्त्यांचे बांधकाम करण्यास मदत केली आहे. या साखर कारखान्यामुळे ग्रामीण बेरोजगारीची समस्यादेखील मोठ्या प्रमाणात नाहीशी होत गेली आहे.

देशातील मुख्य व्यवसाय शेती असला, तरी बहुतांशी कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन उपलब्ध नाही. ते दुसऱ्याच्या शेतामध्ये शेतमजूर म्हणून किंवा कारखान्यात कामगार म्हणून काम करतात. भारतातील शेती लहरी मान्सूनवर अवलंबून आहे. शेतीत पाणीपुरवठ्याच्या सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे शेतीत वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. देशात आणि राज्यात दिवसेंदिवस बेरोजगारांचे प्रमाण वाढत चालेले आहे. या बेरोजगारांना गावात रोजगार उपलब्ध नसल्या कारणाने ते परिसरातील साखर कारखान्यात अकुशल कामगार म्हणून दाखल होतात व तुटपुंज्या पगारात अधिक वेळ मेहनतीचे काम कारखान्यातील कार्यालयात किंवा यंत्राजवळ करतात. सदरचे काम करत असतांना कामगारांना रोजगारची कोणत्याही प्रकारची शास्वती साखर सम्राटांकडून दिली जात नाही. सदरच्या कामगारांची आर्थिक पिळवणूक संचालक मंडळाकडून सतत केली जाते. आर्थिक परिस्थितीमुळे कर्ज घेणे व ते फेडण्यासाठी पुन्हा काम करणे या दृष्टचक्रात कारखान्यातील कामगार अडकला जातो.

गावात बेरोजगार, घर नाही, शेत नाही, अपुरे शिक्षण, अंगात कौशल्याचा अभाव, पैसा नाही, कर्जाचा बोजा आणि कामाच्या तुलनेने मिळणारा मोबदला कमी व तोही वेळेत मिळत नाही. या भोवऱ्यात सापडलेला हा साखर कामगार, शारीरिक कष्टाची व जोखमीची कामे करायची, म्हातारे आई-बाप, बायको, मुले यांना वाऱ्यावर सोडून कारखान्यात कामावर आलेला हा कामगार म्हणजे माणुसकीला काळीमा फासणारी बाब आहे. उन-वारा, रात्र-पहाट करून कारखान्याचे कामे करायची तरीही

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

स्वतःचे व कुटुंबाचे जीवन मात्र सामाजिक व आर्थिक मागास्लेपनातच जगायचे, त्यामुळे साहजिकच साखर कामगारांमध्ये असंतोष निर्माण होत चालेला आहे.

सर्वसाधारणपणे कामगारांमध्ये असंतोष का निर्माण होतो, हे समजण्यासाठी त्याची सामाजिक, आर्थिक, मानसिक व कौटुंबिक पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक ठरते साखर कारखान्यातील बहुसंख्य कामगार खेड्यात राहतात व शेती करतात. त्यामुळे आपल्या कामाबाबत व कामावर जाण्याबाबत एक प्रकारची अप्रियतेची जाणीव निर्माण होते. कामगार व मालक यांच्यातील आर्थिक दरी दिवसेदिवस कमी होण्याऐवजी ती वाढत चालेली दिसून येत आहे. अश्या या साखर कारखान्यातील अंतर्गत कामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्येंचा अभ्यास करण्यासाठी सदर विषयाची निवड केली आहे. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास करण्यासाठी सदरचा विषय केंद्रित केलेला आहे.

२. विषयाची निवड

साखर कारखान्यात दोन प्रकारचे कामगार असतात. पहिल्या प्रकारात कारखान्यातील अंतर्गत भागात काम करणारे कामगार, म्हणजेच कारखान्याच्या कार्यालयात व यंत्राजवळ काम करणारे हंगामी व कायमस्वरूपी कामगार. दुसऱ्या प्रकारात कारखान्याच्या बाहेर उसाची तोडणी, वाहतूक करणारे हंगामी स्थलांतरित कामगार यांचा समावेश होतो. साखर उद्योगात कारखान्याच्या अंतर्गत भागात काम करणाऱ्या कामगारास महत्वाचे स्थान आहे. साखर कारखाने कामगारांची भरती संचालक मंडळाच्या मार्फत करतात. त्यामुळे या कामगारांस साखर कारखाने कायमस्वरूपी कामगार मानण्यास तयार नसल्याने या कामगारंची स्थिती **'ना घर का ना घाट का'** अशी निर्माण झालेली आहे. कामगार वर्ग गरजू असल्याकारणाने संचालक मंडळामार्फत त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले जाते. दर वर्षी हंगाम सुरु झाला म्हणजे ऑक्टोबर ते जानेवारी या कालावधीत कामगार हंगामी कामगार म्हणून काम करतो, मात्र काम करताना तो प्रत्येकवर्षी अनिश्चित उज्वल भविष्याच्या गप्पा मारताना दिसतो. या कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. कोणत्याही प्रकारची भर पगारी रजा नाही, तांत्रिक कालावधीमध्ये कारखाना बंद असल्यास पगार नाही, मुलांना शिक्षणाच्या सुविधा नाही. अश्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये हे कामगार जीवन जगतात, म्हणून या महत्वपूर्ण विषयाचीप्रस्तुत अध्ययनासाठी निवड केली आहे.

3. अभ्यास क्षेत्र व कालावधी

सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या सामाजिक व आर्थिक अभ्यासासाठी संशोधकाने **नाशिक जिल्ह्याची** निवड केलेली असून, नाशिक जिल्ह्यात **५ सहकारी व २ खाजगी** साखर कारखाने आहे. पाच सहकारी साखर कारखान्यांपैकी नाशिक जिल्ह्यात **३ साखर कारखाने उर्जित अवस्थेत** आहेत. म्हणून **दिंडोरी तालुक्यातील कादवा सहकारी साखर कारखाना, निफाड तालुक्यातील रानवड सहकारी साखर कारखाना व कळवण तालुक्यातील वसंत दादा सहकारी साखर कारखाना** यांची निवड केलेली आहे.

उपरोक्त सहकारी साखर कारखान्यातील कामगारांचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास करण्यासाठी संशोधकाने विशेषतः **२००१ ते २०१८** या कालावधी निश्चित केला आहे.

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

आकृती क्र. १: अभ्यास क्षेत्राचा नकाशा



४. उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रकारे निचित केली आहेत.

१. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या उत्पन्नाचा व खर्चाचा तौलनिक अभ्यास करणे.

३. सहकारी साखर कारखान्यामार्फत कामगारांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा चिकित्सक अभ्यास करणे.

४. सहकारी साखर कारखान्यातील कामगार व त्यांच्या कुटुंबाचा शैक्षणिक, मानसिक व आरोग्य विषयक बाबींचा अभ्यास करणे.

५. कामगारांच्या समस्यांचा आढावा घेणे आणि कामगारांच्या जीवनात आर्थिक आणि सामाजिक सुधारणा घडून येण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

५. गृहीतके

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीत कृत्ये प्रमाण मानली आहेत

१. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती निकृष्ट असून ते हलाखीचे जीवन जगतात.

२. वर्षानुवर्षे सहकारी साखर कारखान्यामध्ये काम करूनही त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसून येत नाही.

३. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या वेतनात सातत्य आढळून येत नाही.

६. संशोधन पद्धती

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेली संशोधन पद्धती व माहिती संकलनाचे स्रोत पुढील प्रमाणे आहेत.

६.१ माहिती संकलनाचे स्रोत

प्रस्तुत संशोधनात माहिती व आकडेवारी मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्री या दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात येइल.

प्राथमिक सामग्रीच्या **(प्रश्नावली व मुलाखत)** साह्याने सहकारी साखर कारखान्यातील कामगार, कामगारांची कुटुंबे, त्यांचा पगार व त्यांना मिळणाऱ्या सेवा-सुविधां इ. बाबतची माहिती संकलित करता येइल. प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करून कामगारांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना भेटून त्यांची मुलाखत घेवून सदरची माहिती संकलित केली जाइल. तसेच कारखान्याचे संचालक मंडळ, कार्यालयीन अधिकारी, कामगार नेते यांना भेटून त्यांची मुलाखत घेवून सदरची माहिती संकलित केली जाइल.

प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी दुय्यम माहिती प्रबंध, शोधनिबंध, साखर आयुक्तालयाचे अहवाल, वार्षिक अहवाल, केंद्र व राज्य शासनाची विविध प्रकाशने, शासनाची वेगवेगळी परिपत्रके, साखर डायरी, विविध संशोधन पत्रिका, ग्रंथ, साप्ताहीके, इंटरनेट, वर्तमान पत्र यातून संकलित करता येईल.

६.२ नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्राथमिक सामग्रीचा प्रामुख्याने वापर केला जाईल. **नाशिक जिल्ह्यातील उर्जित अवस्थेत** असणारे सहकारी साखर कारखाने निवडून विशेषतः **निफाड तालुक्यातील रानवड, दिंडोरी तालुक्यातील कादवा, कळवण तालुक्यातील वसंत दादा सहकारी साखर कारखाना** या सदरच्या सहकारी साखर कारखान्यांमध्ये एकूण किती कामगार काम करतात याचा शोध घेवून यादृच्छीक नमुना निवड पद्धतिचा (Random Sampling Method) वापर करून योग्य त्या संख्येने प्रत्येकी १०० आणि एकूण ३०० कामगारांची निवड केली असुन प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती संकलित केली जाणार आहे.

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

७. संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनात सहकारी साखर कारखान्यातील कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा आढावा घेतला जाणार आहे. साखर कामगार **व साखर कारखानदार यांच्यातील मुख्य दुवा साधणाऱ्या व्यवस्थापकाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला आहे. कारखान्यामार्फत कामगारांना दिल्या जाणाऱ्या सेवा-सुविधांचा यात अभ्यास केला आहे. तसेच कामगारांचे वेतन व त्यांचा खर्च यांचा तुलनात्मक अभ्यास** करून कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक घटकावर सदरच्या संशोधनात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

८. संशोधनाचे महत्व

१. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण विकासात सहकारी साखर कारखान्यांची भूमिका समजून घेण्यासाठी.

साखर कारखान्यांनी ग्रामीण विकासासाठी कोणती आर्थिक, सामाजिक,शैक्षणिक,आरोग्य विषयक व पायाभूत सुविधा निर्माण केल्या

२. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांचे आर्थिक आणि सामाजिक प्रश्न समजून घेण्यासाठी.

कार्यक्षेत्रातील उस उत्पादक,कामगार व समाज यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न जाणून घेणे.

३. सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती अभ्यासण्यासाठी.

कारखान्याचे ताळेबंद विचारात घेऊन कारखान्यांची आर्थिक स्थिती जाणून घेणे व उपाय सुचविणे.

४. सहकारी साखर कारखान्यातील कामगारांचे कौटुंबिक व शैक्षणिक समस्या जाणून घेण्यासाठी.

साखर कारखान्यातील कामगारांच्या मुलाखती घेऊन त्यांचे कौटुंबिक,आर्थिक व सामाजिक, शैक्षणिक समस्या समजून घेणे.

९. संदर्भ साहित्याचा आढावा

१. **भापकर डी. जे. , अपराध व्ही. एच. (१९८४)** यांनी कृष्ण सहकारी साखर कारखान्यातील ४४ बैलगाडीवान कुटुंबांचा अभ्यास केला असता त्यांना असे आढळून आले कि, ऊस तोड कामगारांमध्ये २१ ते ३५ वयोगातील कामगार अधिक आहेत. सदरचे कामगारांमध्ये निरक्षरता मोठ्या प्रमाणावर आहे.

२. **हिंगे विजय एन. (१९८४)** यांनी 'Sick Co-operative Sugar Factories in Maharashtra' या विषयावर महाराष्ट्रातील ५६ साखर कारखान्यांचा अभ्यास करून राज्यातील साखर कारखान्यात ५० हजार कामगार आहेत. त्यांनी निवडलेल्या साखर कारखान्यांमध्ये १४ आजारी, १३ मध्यम व ८ तंदुरुस्त कारखाने दिसून आले.

३. **चिडे बी. एम. (१९८६)** यांनी गंगापूर सहकारी साखर कारखाना, जिल्हा औरंगाबाद येथील ऊसतोड कामगारांचा अभ्यास केला असता त्यांना असे आढळून आले कि, सर्वात जास्त कामगार २० ते ३० वर्ष वयोगटातील होते. त्यातील ६८% कामगार विवाहित असल्याचे दिसून आले. सदरच्या कामगारांमध्ये निरक्षरता व आरोग्य विषयक ज्ञान यांचा अभाव दिसून आला.

४. **कामगार आयुक्त (१९८७)** कामगार आयुक्तांनी ८९ साखर कारखान्यांना प्रश्नावली पाठवली होती. त्यापैकी २२ कारखान्यांनी माहिती भरून पाठविली. २२ कारखान्यात ७७७३१ ऊसतोड कामगार होते. २२ कारखान्यांपैकी फक्त ८ कारखान्यांनी कंत्राटी कामगार अधिनियमाखाली नोंदणी केल्याचे आढळले.

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

५. **कासार डी. व्ही. (१९८७)** यांनी पुणे जिल्ह्यातील छत्रपती सहकार साखर कारखान्याचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला कि, सदरच्या कारखान्यांमध्ये स्थलांतरित कामगारांचे प्रमान जास्त असून यांना कारखान्यामार्फत कुठल्याही सुविधा पुरविल्या जात नाहीत. त्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

६. **नागमणी, राजेश्वरी (१९८७)** यांनी शाळेतील मुलांच्या गळतीचा अभ्यास केला असता त्यांच्या असे निदर्शनास आले कि, मुलांच्या पालकांचा हंगामी व्यवसाय ऊसतोड असल्यामुळे त्यांचे पालक हंगामात ऊस तोडीसाठी स्थलांतर करतात. त्यामुळे मुलांना शाळेपासून वंचित राहावे लागते.

७. **शिंदे सुरेश (१९९७)** यांच्या सहकार्याने सासवड साखर कारखान्यातील कामगारांची आर्थिक व सामाजिक परीस्थीती अभ्यासली असता ती अत्यंत खालावलेली दिसून आली.

८. **गुरु गोपाल (१९९९)** यांनी महाराष्ट्रातील साखर धंदा व साखर कामगार चळवळ या विषयर शोध पुस्तिका सदर केली. यात कामगारांच्या पिळवनूकीचे विवेचन केले आहे.

१०. प्रकरणानुसार प्रबंधाची मांडणी

सदर संशोधनाची विभागणी ८ प्रकरणांमध्ये केलेली आहे.

प्रकरण १: प्रास्ताविक

प्रकरण २: संशोधन पद्धती व संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण ३: नाशिक जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण ४: सहकारी साखर कारखाण्याची व कामगारांची कार्यपद्धती

प्रकरण ५: साखर कामगारांसंबंधी धोरण

प्रकरण ६: साखर कामगार सुविधांचा तुलनात्मक अभ्यास

प्रकरण ७: साखर कामगारांचे सामाजिक व आर्थिक विश्लेषण

प्रकरण ८: निष्कर्ष व शिफारशी

११. संदर्भ ग्रंथ

- कामगार आयुक्त (१९८७) 'ऊस तोडणी व वाहतूक कामगारांचा सर्वेक्षण अहवाल', मुंबई कार्यालय, सामाजिक सर्वेक्षण शाखा, कामगार आयुक्त मुंबई.
- पाटील लीला (१९९४) 'स्थलांतरित मजूर कुटुंबाची वैशिष्ट्ये', गोडवा पान. ९३.
- “Daily Loksatta”, September 21, 1995. p.5. 14. Ahmednagar District Gazetteer op. cit. p. 919.
- Barik B.C. (1994) Rural Migrants in an Urban Setting: A Case Study.

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

- Breman (1996) Footloose Labour: Working in India's Informal Economy.
- C.B. Mamoria, Agricultural Problems of India, Kitab Mahal, Allahabad, 1985, p. 9.
- Co-operative Movement at Glance in Maharashtra - 1995, Published by Office of the Commissioner for Co-operation and Registrar of Co-operative Societies, 1995, Maharashtra State, Pune, 32"‘‘ Issue, pp. 4-5.
- Deshpande (2008) A Study of Health and Nutrition of Migrant Sugarcane Cutter Women workers. [8] Breman.J. (1978) Economic and Political Weekly, XII.31, 32, 33:1316-1360.
- Economic Survey of Maharashtra 1994-95, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra. Bombay p.56.
- G.S. Kamat, Management of Co-operative Sugar Factories in Maharashtra, Maharashtra Rajya Sahakari Sangh, Bombay (Year not mentioned) p. 12.
- Guru Gopal (1989) Second Maharashtra Rajya Sugar Workers Conference, Nifad, Nasik on 1 and 2 October.
- Hiramani A.B. (1977) Social Change in Rural India; A Study of two Villages in Maharashtra.
- J. rhulijaram Rao, B.V. Natarajan and K.V. Bhagyalakshmi, Sugarcane, Indian Council of Agricultural Research, New Dlehi, 1983, p. 105.
- Jodhaka, Surender S. (2002) Economic and Political Weekly, 1813-1823.
- Jugale V.B. (1997) Employment Wages and Industrial Relations: Farm Sector Labourers of Sugar Co-op in Maharashtra.
- Kasar D.V. (1992) Economics of Seasonal Migration.
- Misra and Puri, Indian Economy, Himalaya Publishing House. Bombay, 1994, p. 611.
- Nashik District Gazetteer, 1976. Government of Maharashtra, p.l.
- Performance of Co-operative Sugar Factories in Maharashtra for crushing seasons 1993-94 and 1994-95, Vasantdada Sugar Institute, Manjari, Dist. Pune, p.3.
- Racine J. (1997) Peasant Moorings: Village Ties and Mobility Rationales in South India.
- S.D, Tupe, Sugar Co-operatives and Rural Change Dwaraka Prakashan, Pune, 1992, p.6.

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.

- Salve W.N. (1991) A Socio-economic Study of Seasonal Migrant in Co-operative Sugar Factories with special Reference to Kolhapur District.
- Socio-Economic Review^ of Ahmednagar District, 1995-96, p.48. 17. 'Artha Vijnana', Quarterly Journal of Gokhale Institute of Politics and Economics, Pune, Dec. 1987, p. 319. 18. Ahmednagar Zilla Parishad Diary. 1993.

संशोधक

अनिल लक्ष्मण गायकवाड

मार्गदर्शक

डॉ. तुकाराम मुंडे

उपप्राचार्य व प्राध्यापक

के के एम महाविद्यालय

मानवत ता. मानवत, जि. परभणी

An evaluation version of novaPDF was used to create this PDF file.
Purchase a license to generate PDF files without this notice.